RIGHT TO INFORMATION

# महापारेषण

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,

(CIN No.:-U40109MH2005SGC153646)


कार्यालयाचे नाव :- कार्यकारी अभियंता , अउदा संवसु विभाग नांदेड.
कार्यालयाचा पत्ता :- १३२ केव्ही उपकेंद्र जंगमवाडी परिसर, महापारेषण कंपनी मर्यादित, नांदेड-४३१६०५
संपर्क :- ०२४६२ - २६१८१७ (का / फॅक्स) ०२४६२ - २६१८१६ (वै)
ई-मेल :- ee2240@mahatransco.in www.mahatransco.in


**जा.क्र काअ/अउदावि/नांदेड/मासं/** 129 दिनांक :- 10 FEB 2022

### जाहीर नोटीस

अउदा संवसु विभाग महापारेषण, नांदेड अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणुन सन २०२२-२३ करीता वीजतंत्री (Electrician) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अउदा संवसु विभाग नांदेडच्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन अर्ज व जाहिरातीत नमुद पत्त्यावर जाहिराती सोबत दिलेला फॉर्म व त्याशी संबंधीत कागदपत्रे पाठवणे बंधनकारक आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.२०/०२/२०२२ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत राहिल, त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. वीजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार एक (०१) वर्षाचा राहिल.

| आस्थापनेचा नाव व रजिस्ट्रेशन कंमाक | ट्रेड | एकुण | विहित फॉर्म ज्या पत्त्यावर पाठवयाचा आहे त्या कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| अउदा संवसु विभाग नांदेड<br>E05202700372 | वीजतंत्री<br>(Electrician) | एकुण जागा<br>३१ | कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग नांदेड, १३२ के व्ही उपकेंद्र जंगमवाडी परिसर नांदेड - ४३१६०५ |

शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नौकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**सोबत:**-शिकाऊ उमेदवार भरती करता अनुसरित येणारी पध्दत, अटी व फॉर्म.

(एम.जी.सोनकांबळे)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग,नांदेड

महापारेषण

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,**

**(CIN No.:-U40109MH2005SGC153646)**

# जाहिर सुचना

अउदा संवसु विभाग महापारेषण, नांदेड. अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा-१९६१ नुसार आय. टी. आय. विजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारी अर्ज वर्ष २०२२-२३ या सत्राकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता भरती करण्यात येत आहे. करीता खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीना अधिन राहुन इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी / उमेदवारांनी दि.२०/०२/२०२२ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापना क्र. E05202700372 वर नोंदणी करून ऑनलाईन अर्ज करावे. तसेच ऑनलाईन नोंदणी केलेल्या अर्जाची Screenshot काढून महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या जाहिराती सोबत जोडलेला फॉर्म सह खालील नमुद केलेल्या पत्त्यावर संपुर्ण कागदपत्रा सहीत टपालाद्वारे दि.२८/०२/२०२२ पर्यंत पाठवावेत.

१. उमेदवार / प्रशिक्षणार्थी / आरक्षण टक्केवारी खालीलप्रमाणे.

| विभागाचे नांव | जागा | अ. जा. १३% | अ. ज. ७% | वि. जा. अ. ३% | भ. ज. ब २.५०% | भ. ज. क. ३.५०% | भ. ज. ड. २% | वि.मा. प्र २% | इ. मा. व. १९% | ईडब्लूएस (EWS) १०% | खुला ३८% | एकुण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अउदा संवसु विभाग, नांदेड | ३१ | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ११ | ३१ |

२. ऑनलाईन नोंदणी / अर्ज करण्याची अंतिम दि.२०/०२/२०२२ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत राहिल.

३. वरील प्रमाणे अर्ज करणा-या उमेदवारांनी सदर अर्जाची Screenshot सहीत जाहिराती सोबत जोडलेल्या फॉर्म मध्ये अचुक माहिती भरुन त्याशी संबंधीत दस्तऐवज कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, १३२ के.व्ही उपकेंद्र जंगमवाडी परिसर नांदेड -४३१६०५ या पत्त्यावर पाठवावेत.
(कंपनीच्या धोरणानुसार आरक्षण अंमलबजावणीसाठी आवश्यक)

**या साठी खालील नमुद केलेले दस्ताऐवज आवश्यक असतील.**

अ.**apprenticeshipindia.gov.in** या संकेत स्थळावर उमेदवाराची प्रशिक्षणार्थी उमेदवार म्हणुन नोंद असणे बंधनकारक आहे.

ब. जन्म तारखेसाठी १0वी ची सनद/ शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक.

क. इयत्ता दहावीचे गुणपत्रक

ख.आय. टी. आय. विजतंत्री (Electrician)गुणपत्रक (चारही सत्र / वार्षीक)

ग. आधार कार्ड

घ.अर्जदार / उमेदवार मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र /आर्थिक दुर्बल घटक असल्यास त्याचेही प्रमाणपत्र.

च. यापुर्वी शिकाऊ उमेदवारी केलेली नसावी.

छ. वरील सर्व कागदपत्रांच्या प्रती स्वसाक्षांकित असाव्यात .

४. सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे संबंधित सर्व परिपत्रके, अटी व शर्ती, नियम व अटी लागु राहतील व अधिक माहितीसाठी www.mahatransco.in या संकेतस्थळावर Career या सदराखाली जाहिरात पाहावी ,तसेच सदर भरती प्रक्रियेमध्ये वेळोवेळी या पुढे होणारे बदल हे महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

५. उमेदवारांची निवड त्यांचे आय. टी. आय. चे चारही सत्राच्या गुणांच्या व एस. एस. सी. च्या गुणाच्या आधारे होईल व मौखीक चाचणी घेतली जाणार नाही किंवा इतर कोणतेही गुण ग्राहय धरण्यात येणार नाही.

६. वरील प्रमाणे नमुद अंतिम दिनांका नंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

टिप:-१. फक्त ऑनलाईन नोंदणी केलेल्याउमेदवारांचे टपालाद्वारे विहित कालावधीत प्राप्त झालेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील याची नोद घ्यावी. (प्रत्यक्ष आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.)

(एम.जी.सोनकांबळे)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग,नांदेड

## शिकाऊ उमेदवार भरती करीता अनुसरित येणारी पध्दत व अटी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव व पत्ता | :- | | कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग नांदेड, १३२ के .व्ही .उपकेंद्र जंगमवाडी परिसर नांदेड - ४३१६०५ |
| २. | मागणी करणारे अधिकारी यांचे पदनाम | :- | | कार्यकारी अभियंता |
| ३. | निवड पध्दत | :- | | गुणवत्तेनुसार |
| ४. | क) भरावयाच्या पदाचे नाव व संख्या | :- | | वीजतंत्री (शिकाऊ प्रशिक्षणार्थी) पदसंख्या: ३१ |
| | ख) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी | :- | | वीजतंत्री ०१ वर्ष |
| | ग) विद्या वेतन | :- | | शासकिय धोरणानुसार |
| ५. | शैक्षणिक अर्हता | १. | | इ. १० वी उत्तीर्ण व |
| | | २. | | राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद एन. सी. टी. व्ही. टी. नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन आय. टी. आय. दोन वर्ष वीजतंत्री (Electrician) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ६. | राखीव पदे | :- | | कंपनीच्या धोरणानुसार |
| ७. | भरती प्रक्रियापुढील प्रमाणे राबविण्यात येईल | १. | | जे उमेदवार www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करतील व त्या अर्जाची Screenshot सहीत यासोबत जोडलेला फॉर्म भरून नमूद कार्यालयीन पत्त्यावर आवश्यक दस्तऐवज सह पाठवावी. |
| | | २. | | **लगतवरच्या रकाना मध्ये नमुद असल्यानुसार दोन्ही स्वरूपात अर्ज करणा-यांचेच अर्ज विचारात घेतले जातील.** |
| | | ३. | | आय. टी. आय. उत्तीर्ण गुण व एस. एस. सी. उत्तीर्ण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. |
| | | ४. | | कंपनीच्या विहीत तरतुदीनुसार आरक्षणानुसार निवड यादी तयार केली जाईल. एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते गुणवत्तेनुसार प्रवर्गाचा विचार न करता भरले जाईल. |
| | | ५. | | निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडुन वैद्यकिय चाचणी करून घेणे बंधनकारक राहिल. |
| | | ६. | | कॉन्ट्रॅक्ट रजिस्ट्रेशन झाल्याशिवाय कोणताही उमेदवार शिकाऊ उमेदवारीस पात्र ठरणार नाही. |
| ८. | वयोमर्यादा | :- | | दि.२०/०२/२०२२ रोजी किमान १८ वर्ष पुर्ण /कमाल ३८ वर्ष (मागासवर्गीय /आर्थिक दुर्बलघटक यांना ५ वर्ष शिथीलक्षम) |
| ९. | शिकाऊ उमेदवारीकरीताअर्ज भरावयाची अंतिम तारीख | :- | | दि. २०/०२/२०२२ (२३.५९) पर्यतचे अर्ज |
| १०. | उमेदवार यांनी घ्यावयाची काळजी बाबत | १. | | उमेदवाराने आपला प्रोफाईल तपासुन घेणेची जबाबदारी उमेदवाराची असेल. |
| | | २. | | ऑनलाईन अर्ज सादर करताना एस. एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय.टी. आय विजतंत्री उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करून माहिती भरावी. |
| | | ३. | | एस. एस. सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र, आय. टी. आय. उत्तीर्ण सर्व सत्रांचे गुणपत्रक / प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) स्वसांक्षाकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असेल तर मागासवर्ग जात प्रमाणपत्र तसेच आर्थिक दुर्बल घटक (EWS) मधुनै अर्ज केला तर (EWS) प्रमाणपत्र www.apprenticeshipindia.gov.in वर अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच सोबत जोडलेला विहित फॉर्म screenshot आवश्यक दस्ताऐवज सोबत सादर करणे बंधनकारक आहे. |
| | | ४. | | शिकाऊ उमेदवारांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस. एस. सी मार्क, आय. टी. आय. मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५. | शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-याकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी. |
| | | ६. | शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन अर्ज सादर करावा व टपालाद्वारे पाठविण्यात येणारा फॉर्म दस्ताऐवज फोटो सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| | | ७. | प्रत्येक उमेदवाराची वर्तवणुक चांगली व शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे. याबाबत कोणतीही गैरवर्तवणुक केल्यास शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ मधील १७ अन्वये शिक्षेस ते पात्र ठरतील. |
| | | ८. | प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ३०० मार्कची (६ तास अवधीची) परिक्षा उमेदवाराने देणे अनिवार्य राहील.<br>जो उमेदवार प्रशिक्षण कालावधी पुर्ण करेल तोच उमेदवार परीक्षेस बसण्यास पात्र असेल. |
| ११. | **एकाच उमेदवाराने खालील विभागीय कार्यालयास एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास.**<br>१. अउदा संवसु विभाग लातुर,<br>२. अउदा संवसु विभाग बीड,<br>३. अउदा संवसु विभाग नांदेड,<br>४. ४०० के .व्ही ग्रहण केंद्र विभाग गिरवली,<br>५. ४०० के.व्ही ग्रहण केंद्र विभाग कुंभारगाव | :- | एकाच उमेदवाराने अउदा संवसु मंडल कार्यालय **परळी वैजनाथ** या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या समोर नमुद विभागीय/आस्थापना कार्यालयात प्रत्येकी एक प्रमाणे असे एकुण ५ अर्ज केल्यास किंवा एका पेक्षा जास्त अर्ज केल्यास व त्या उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड एकापेक्षा जास्त कार्यालयात होत असल्यास अशा उमेदवाराची निवड त्यांने टपालाद्वारे पाठविलेल्या फॉर्म मध्ये नमुद पत्ता, ज्या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येतो किंवा नजीक आहे त्या एकाच ठिकाणी त्याची निवड करण्यात येईल आणि ते अंतिम असेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रत्येक फॉर्मवर वेगवेगळे पत्ते नमुद केल्यास फॉर्मवरील व आधारकार्ड वरील पत्ता एक असेल असाच पत्ता विचारात घेण्यात येईल. |
| १२. | अचुक माहिती भरणे | :- | उमेदवारांनी आपली प्रत्येक माहिती अचुकपणे विहित फॉर्म मध्ये भरावी कारण त्यात नमुद माहिती आधारे निवड यादी बनविण्यात येणार असुन त्यात पुन्हा बदल करता येणार नाही. निवड यादीत नमुद उमेदवारांचीच फक्त कागदपत्रे निवड झाल्यानंतर पडताळण्यात येतील. पडताळणी अंती अपात्र ठरल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा विचार केला जाईल. **फॉर्म मधील चुकीच्या भरलेल्या माहितीमुळे निवड झाली नाही तर त्यास संपुर्णपणे उमेदवार जबाबदार राहील.** |
| १३. | इतर संबंधित माहिती | :- | सदर शिकाऊ भरतीमध्ये अंशत: बदल किंवा संपुर्ण रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवत आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. तसेच सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| १४. | निवड यादी | | www.mahatransco.inया संकेतस्थळावर Career या सदराखाली प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५. | मदतीसाठी संपर्क | :- | मानव संसाधन विभाग प्रमुखाचा भ्रमणध्वनी क्रंमाक ८५५४९९५०१७ (फक्त कार्यालयीन वेळेत) |

**(एम.जी.सोनकांबळे)**
**कार्यकारी अभियंता**
**अउदा संवसु विभाग, नांदेड**

# शिकाऊ उमेदवारीसाठीचा अर्ज
## (जो जाहिरातीत नमुद कार्यालयीन पत्त्यावर पाठवायचा आहे)

Apprentice Registration Number :-

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव (आडनाव प्रथम) (आधार व शैक्षणीक कागदपत्राशी सुसंगत) :-

२. जन्मतारीख १०वी च्या सनद नुसार :-

३. जातीचा प्रवर्ग (महाराष्ट्र शासनानुसार वर्गीकृत प्रवर्ग) (अजा/अज/विजा.अ/भज.ब/ भज.क/भज.ड/विमाप्र/इमाव/ईडब्युएस/खुला) :-

४. आधार क्रमांक :-

५. दहावीचे गुण एकुण गुण :- प्राप्त गुण टककेवारी

६. आय.टी.आय.चे गुण (चार सत्रे) :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |
| व्दितीय सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |
| तृतीय सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |
| चतुर्थ सत्र एकुण गुण | | प्राप्त गुण | | टककेवारी | |

७. सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता :-

८. कार्यरत भ्रमणध्वनी क्रमांक :-

९. अचुक व कार्यान्वीत ई.मेल आडी :-

### प्रतिज्ञापत्र

वर उल्लेखित माहिती ही खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी कुठल्याही पातळीवर रद्द होऊ शकते याची मला कल्पना आहे. अशी उमेदवारी रद्द केल्यास माझी कुठलीही हरकत असणार नाही.

................
(उमेदवाराचे नाव व सही)

| सोबत जोडावयाची कागदपत्रे | जोडले आहे/नाही |
|---|---|
| १ आधार कार्ड | |
| २ दहावीची सनद | |
| ३ दहावीची गुणपत्रक | |
| ४ आय.टी.आय. चे चार सत्राची गुणपत्रके | |
| ५ मागासवर्गीय असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| ६ आर्थिक दृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र इ. | |
| ७ www.apprentieshipindia.gov.in याव्दारे ऑनलाईन अर्ज केल्याचे Screen_shot/ Print | |

**(टिप:- १. फक्त ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचे टपालाद्वारे विहित कालावधीत प्राप्त झालेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील यांची नोद घ्यावी. (प्रत्यक्ष आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.)**